स्वप्नील बुचडे

# हैद्राबाद मुक्ती संग्राम

*वेगळी बाजू मांडणारी कादंबरी*

१

साठोत्तरी मराठी साहित्यात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्यप्रवाह उदयाला आले. त्यापैकी दलित आणि ग्रामीण साहित्याला मान्यताही मिळाली. त्याचबरोबर स्त्रीवादी साहित्यप्रवाह प्रकाशात आला. साधारणतः १९८०च्या दरम्यान उदयाला आलेल्या मुस्लीम साहित्याची फारशी दखल घेतली गेली नाही. या साहित्यप्रवाहाची स्वतंत्र साहित्यसंमेलन भरत असून कविता, कथा, आत्मकथा, आणि वैचारिक लेखन हे वाङ्मय प्रकार मुस्लीम साहित्यिकांनी सहज हाताळले, तरीही मराठी समीक्षकांचे या प्रवाहाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसते. त्याचे कारण काहीसे धार्मिक आणि सामाजिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. दलित साहित्यप्रवाह उदयास आल्यानंतर या साहित्यावर प्रस्थापित समीक्षकांनी ज्या प्रकारची टीका केली किंवा त्याचे अस्तित्वच नाकारले, त्यावरून मराठीतील प्रस्थापित समीक्षक जात आणि धर्मश्रेष्ठत्वाच्या अहंमन्यतेने किती ग्रासला होता व आहेत याची प्रचीती येते. त्यामुळे मराठी समीक्षकांनी मुस्लीम साहित्याकडे दुर्लक्ष का केले किंवा दलित साहित्याविषयी त्यांनी द्वेषमूलक भूमिका का घेतली, यामागे त्यांची पूर्वापार चालत आलेली मानसिकता कारणीभूत असल्याचे दिसून येते.

भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यानंतर भारत – पाकिस्तानची झालेली फाळणी, हैद्राबाद संस्थान भारतात विलीन होण्यासाठी

ईमेलः swapnilsopan88@gmail.com

करावा लागलेला संघर्ष, यामुळे हिंदू - मुस्लिमांत निर्माण झालेली एकरूपता दुभंगली गेली. ते दुभंगलेपण जखमांच्या रूपाने ताजे असतानाच बाबरी मशीद प्रकरणाने त्या जखमा पुन्हा चिघळल्या गेल्या. या पार्श्वभूमीवर साहित्यनिर्मिती करणाऱ्या साहित्यिकाला अंतर्मुख केले. त्यातून मराठीमध्ये मुस्लीम धर्मियांच्या व्यथा - वेदना मांडणाऱ्या स्वतंत्र मुस्लीम मराठी साहित्यप्रवाहाची मांडणी झाली. मराठीतील प्रस्थापित साहित्यिकांनी आपल्या साहित्यात मुस्लीम समाजाच्या जाणिवा मांडल्या नाहीत किंवा ज्या जाणिवा मांडल्या, त्यातून मुस्लीम समाजाचे विकृतीकरण केले असल्याचे प्रत्ययास आले. त्यामुळे आपल्या जाणिवांचे साहित्य निर्माण करावे या वृत्तीतून मुस्लीम मराठी साहित्यप्रवाह उदयास आला ही वस्तुस्थिती आहे. मराठीतील समीक्षकांचे फारसे लक्ष या साहित्यप्रवाहाकडे गेले नाही, तरी मुस्लीम लेखक मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती करीत आहेत. ललित लेखनाच्या क्षेत्रातील सय्यद अमीन, गुलाम नदाफ, मोहम्मद नैसर्गी, हमीद दलवाई, मुमताज रहिमतपूरे, मुबारक शेख, खलील मोमीन, इसाक मुजावर, जावेद कुरेशी, अजीज नदाफ, राजन खान, नसीमा पठाण, मिर्झा अटली, रफिक सुरज आणि वैचारिक लिखाण करणाऱ्यांमध्ये फक्रुद्दीन बेन्नूर, हमीद दलवाई, सय्यद भाई, रझिया पटेल, अन्वर राजन यांच्यापासून ते राजेखान शाणेदिवान यांच्यापर्यंतचा प्रवास नोंदवता येईल. ही मुस्लीम मराठी साहित्यप्रवाहातील काही महत्त्वाची नावे म्हणून विचारात घ्यावी लागतील. या साहित्यप्रवाहातील कलाकृतींचा समग्र विचार हा स्वतंत्र संशोधनाचा विषय होऊ शकतो इतके वैविध्य त्यात आहे. त्यासाठी शकील शेख यांनी लिहिलेल्या 'जुबा' ह्या कादंबरीचा विचार केला तरी या साहित्यप्रवाहाचे नाविन्य लक्षात येऊ शकेल. यादृष्टीने जुबा या कादंबरीचे विश्लेषण या लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.

२

शकील शेख जुबाच्या मनोगतात पहिल्यांदाच म्हणतात की, कुलाली ! आजच्या कर्नाटक राज्यातील अफजलपूर तालुक्यातील एक छोटेसे गाव. या गावचे 'पीर' राजेबाघसवार ! या राजेबाघसवार ! उरुसानिमित्त जेव्हा जेव्हा कुलाली गावी मी जातो, तेव्हा गावातील मुस्लिमांची घरे जळलेली, पडलेली दिसतात. मी आजूबाजूला काही गावांत भेटी देतो. तेव्हा मला तेथेही हीच स्थिती जाणवते. उरुसासाठी जमलेल्या आजूबाजूला खेड्यातील वृद्ध मुस्लिमांपैकी कोणाचे पाय तुटलेले, कोणाचे हात तुटलेले, कोणाच्या डोक्यावर जखमेच्या खुणा दिसतात. मी त्यांच्याविषयी विचार करू लागतो आणि मग राहून शेवटी गावातल्या लोकांशी या गोष्टीवर चर्चा करू लागतो, आणि मग या चर्चेतून साकारतो एक भूतकाळ ! अनेक लोकांना माहीत नसलेला भूतकाळ ! अनेक लोकांपासून लपवून ठेवलेला भूतकाळ ! (शकील शेख : २०१४ : तेरा) ज्यावेळी शकील शेख वरील वर्णन करतात त्यावेळी निश्चितच हिंदू मुस्लीम असा दंगा झाला असल्याची जाणीव मनात घर करायला लागते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबाद हे संस्थान भारतात विलीन करावे यासाठी प्रयत्न झाले. कुलाली हे मुळात हैद्राबाद संस्थानात समाविष्ट असणारे गाव होय. आणि इथल्या लोकांच्या मानसिकतेचा लेखाजोखा कथानकाच्या परीघावर मांडत असतानाच त्यांच्यावर सांस्कृतिक आणि धार्मिक मानसिकतेचा काही परिणाम झाला का याचाही शोध जुबाच्या निमित्ताने शकील शेख मांडू पाहतात.

यापुढील मनोगतात रझाकार, इथला निरपराध

मुस्लीम जनसमुदाय आणि यांना भोगाव्या लागलेल्या यातनांबद्दल ते म्हणतात, सुरवातीला हिंदूंची रझाकारांच्या विरोधात असणारी ही चळवळ गुप्त पद्धतीने, भूमिगत पद्धतीने होती. पण भारत सरकारने हैद्राबाद संस्थानावर कारवाई करण्याचे ठरविले तेव्हा रझाकारांच्या विरोधातील संघर्ष उघडपणे सुरु झाला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सेना हैद्राबाद संस्थानात शिरल्या आणि मग त्या ठिकाणच्या हिंदूंचे मनोधैर्य आणखीन वाढले. त्यांनी मोठ्या प्रमाणात मुस्लिमांची कत्तल करण्यास सुरवात केली. गावागावातील अनेक निरपराध मुस्लीम कुटुंबे; ज्यांना निजाम कोण आहे? कासीम रझवी कोण आहे? रझाकार सेना कशी आहे? हे माहीत नव्हते. अशा लोकांची घरे जाळली गेली. अनेक गावांत मुस्लिमांना एकत्र करून तलवारीने त्यांच्या कत्तली करण्यात आल्या. गावागावातील विहिरी पाण्याऐवजी मुस्लिमांच्या प्रेताने भरल्या. पेवात धान्याऐवजी जिवंत मुस्लीम गाडले गेले. लहान मुलं, वृद्ध स्त्री पुरुष यांची निर्दयपणे मुंडकी छाटण्यात आली. कित्तेक स्त्रिया बेअब्रू करण्यात आल्या, तर कित्येकींना आपलं कपाळ गोंदवून घ्याव लागलं. चार - पाच दिवस ही कत्तल चालत राहिली (शकील शेख : २०१४ : पंधरा). इथल्या या साधारण परिस्थितीचा उल्लेख शेख करतात. ज्या संवादातून इथल्या हिंदू लोकांनी जो अत्याचार मुस्लीम म्हणून त्यांच्यावर केला त्याची दाहकता लक्षात येते. रझाकार सेना, निजामी राजवट यांच्याशी काडीचा संबंध नसतानाही केवळ मुस्लीम म्हणून त्यांच्यावर झालेल्या अन्याय अत्याचाराची नोंद ही कादंबरी घेते. ज्याचा उल्लेख स्वातंत्र्यानंतरच्या अनेक घटनांशी जोडता येतो. मुस्लीम अल्पसंख्याक म्हणून बहुसंख्याक समुदायाकडून त्यांच्यावर जो टोकाचा अन्याय झाला त्याची नोंद यानिमित्ताने घेता येते.

हैद्राबादमधल्या या अन्याय अत्याचाराच्या मागची पार्श्वभूमी होती ती हिंदूंच्या मनात असणारी मुस्लिमांविषयी द्वेषाची भावना. मुळात हैद्राबाद संस्थान हे ८२ हजार चौरस मैलांचे होते. यात हिंदूंची संख्या मोठ्या प्रमाणात होती. या निजामी कारभारात हिंदूना विशेष स्थान नाही असे यांना वाटत होते. त्यामुळे त्यांच्या मनात निजामी सत्तेविषयी एक प्रकारचा असंतोष होता. हैद्राबाद राज्य जर भारतात विलीन झाले नाही, तर निजामी सत्तेत आपल्याला लाचारीचे जीवन जगावे लागेल अशी भावना हिंदूंच्या मनात निर्माण होऊ लागली. त्यात हिंदूंची संख्या मोठ्या प्रमाणात असताना एका मुस्लिमाने आपल्यावर सत्ता गाजवावी ही सल होतीच! आणि यातूनच इथल्या मुस्लिमांवर अन्याय झाले. हैद्राबाद मुक्ती संग्रामाची दुसरी बाजू जी इथल्या मुस्लिमांना या बहुसंख्य व्यवस्थेकडून, प्रस्थापित व्यवस्थेकडून भोगावी लागली याचा उहापोह शकील शेख यांनी जुबा कादंबरीत घेतला आहे. मुळात जुबा म्हणजे कत्तल किंवा संहार होय. याबद्दल बोलताना ज्येष्ठ अभ्यासक दिवंगत कृष्णा किरवले या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात की, शकील शेख यांच्या कादंबरीचे नाव जुबा आहे. जुबा म्हणजे कत्तल किंवा संहार. भारतीय परंपरा प्रामुख्याने धर्म प्राबल्यासाठी ज्या संहारकतेचा उच्छाद मांडले, त्या संहारकतेचे उग्र रूप किती भयानक असू शकते हेच या कादंबरीतून लेखकाने मांडले आहे (शकील शेख : २०१४ : प्रस्तावना : बारा).

ह्या कादंबरीची नेमकी हकीकत आहे ती हैद्राबाद भारतात विलीन व्हावा यासाठी त्या प्रांतातील बहुसंख्य हिंदू लोकांनी उभी केलेल्या व्यापक चळवळीचा. यामध्ये हिंदू - मुस्लीम असाच संघर्ष नोंदवला गेला. हिंदू लोकांना वाटत होते की, हैद्राबाद भारत या नव्या हिंदू राज्यात समाविष्ट व्हावे

तर निजामी राजवटीला वाटत होते की, हे संस्थान निजामाच्या अधिपत्याखाली राहावे. त्यावेळी हैद्राबाद संस्थानाचा निजामाचा कारभार कासीम रझवी बघत होता. त्याची रझाकार संघटना इथल्या हिंदू लोकांवर प्रचंड अन्याय करत होती. याचा प्रतिकार म्हणून इथल्या हिंदू बहुल प्रदेशातील काही लोक या रझाकार संघटनेच्या अत्याचाराचा प्रतिकार गावातील मुस्लिमांना त्रास देऊन करत होत्या. याचेच प्रतिबिंब म्हणजे कुलाली गावातील घटना होय. सिद्धाराम हा मलकप्पा पाटलाचा मुलगा अशिक्षित असून त्याला सतत वाटत असते की, हैद्राबाद संस्थान हे भारतात समाविष्ट व्हावे आणि आपल्यावर अधिकार असणाऱ्या निजामाची आणि मुस्लिमांची सत्ता संपुष्टात यावी. यासाठी सिद्धाराम गावातील मुस्लिमांना विरोध करतो. गावातील हिंदू - मुस्लीम ऐक्याचे प्रतीक असणाऱ्या राजेबाघसवार या पिराच्या उरुसाला विरोध करतो. पण हे दैवत कुलाली गावाच्या हिंदू मुस्लिमांचे ऐक्य जपत असतानाच त्यांना एकत्र आणून त्यांच्यात एकोपा आणि धार्मिक सामंजस्य राखत होते. पण या उरुसाच्या निमित्ताने सिद्धाराम हिंदू मुस्लीम ऐक्याला तडा घालवू इच्छितो.

मुळात कुलाली गावात पाच मुस्लीम घरे. हीच इथल्या हिंदू लोकांच्या आधाराने जगत असतात. यांचे वर्णन करताना शकील शेख म्हणतात की, गावच्या पूर्वेला मुस्लिमांची पाच घरे होती. अल्लीसाब, त्यांची पत्नी, चार मुले, चार मुली, असा त्यांचा परिवार होता. यानंतर पिरसाब यांचे घर होते. पिरसाब स्वतः, त्यांचे आई वडील, पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा त्यांचा परिवार. त्याला लागूनच चाँदसाबचे घर होते. चाँदसाब व त्याची पत्नी, तीन मुली व एक मुलगा असा परिवार होता. त्यानंरचे घर रसूलचे होते. रसूल, त्याची पत्नी, एक सात - आठ वर्षाचा मुलगा असा त्यांचा परिवार होता आणि शेवटी खुतबुचे घर होते. खुतबू, त्याची पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा त्याचा परिवार होता. (शकील शेख : २०१४ : १३) या पाच घरांशी या हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा कसा संबंध जोडला गेला याचे विदारक सत्य म्हणजेच शकील शेख यांची जुबा ही कादंबरी होय.

हैद्राबाद संस्थानातील कुलाली हे गाव तसे कोणत्याही भानगडी विना आपला कारभार करणारे. गावातील प्रस्थापित मलकप्पा पाटील, कल्लप्पा पाटील आणि गुरुलिंगप्पा कलबुर्गी (गुरुजी) हे इथल्या लोकांना आधार वाटत होते. पण मलकप्पा पाटील आणि कल्लप्पा पाटील यांच्यात पिढीजात संघर्ष होता. सिद्धारामच्या भूमिकेच्या विरोधात कल्लप्पा पाटील सतत भूमिका घेत असत. हैद्राबाद मुक्ती संग्रामाची पहिली ठिणगी कुलाली गावात पडते ती, राजेबाघसवार उरूस करायचा नाही. तो देव मुस्लिमांचा आहे आणि आपण त्याची पूजाअर्चा करायची नाही म्हणून. सिद्धाराम यासाठी सर्वांना उत्तेजित करतो. या सिद्धारामच्या कार्याच्या मागे त्याचा मित्र परिवार असतो.

राजेबाघसवारचा उरूस म्हणजे कुलाली गावच्या एकतेचे प्रतीक होते. प्रत्येक धर्माचा व्यक्ती याठिकाणी येवून नतमस्तक व्हायचा. यासंदर्भातील वर्णन असे, गावातला प्रत्येक जाती - धर्माचा माणूस राजेबाघसवारला घरचा पीर मानीत होता. त्यामुळे त्याला नैवेद्य दाखवून नमस्कार करण्यासाठी गावातल्या ब्राह्मणापासून दलितापर्यंत सगळे लोक येत. राजेबाघसवारचा उरूस म्हणजे गावात एक आनंद उत्सवच असे. सासरी गेलेल्या पोरीबाळी, बायका या देखील खास उरुसासाठी माहेरी यायच्या आणि नटून थटून त्या आपल्या पोरांबाळांसहित राजेबाघसवारला नमस्कार करण्यास जात. (शकील शेख : २०१४ : ४) हा उरूस म्हणजे सगळ्यांनी एकत्र येऊन साजरा करण्याचा होता. पण या

उरुसाला सिद्धाराम विरोध करतो. हा मुस्लिमांचा उरूस आहे. हैद्राबाद संस्थानात मुस्लीम बहुसंख्य प्रदेशात सगळीकडे हिंदूंवर अन्याय होत असतानाच आपण इथे यांना मदत करणे चुकीचे आहे. हा काही आपला देव नाही. हे मुस्लीम अन्यायी वागत आहेत. निजामाच्या राज्यात एकही हिंदू अधिकारपदावर नाही. ही सल सतत त्याच्या मनात आहे. म्हणून या मुस्लिमांनी एकतर गाव सोडावे, नाहीतर मरणास तयार व्हावे अशी भूमिका सिद्धाराम घेतो. यावर गुरुलिंगप्पा गुरुजी सिद्धारामला म्हणतात की, या गावातल्या मुस्लिमांची काय चूक आहे सांग मला. त्यांनी कधी रझाकाराच्या विषय काढून गावात गोंधळ घातला? ते कोणत्या हिंदूला काय बोलले? त्यांनी कधी निजामाचं किंवा कासीम रझवीच गुणगान गायलं? मग ते मुस्लीम आहे ही काय त्यांची चूक आहे का? माणसांनं जन्म कोणत्या ठिकाणी, कोणत्या धर्मात घ्यावा हे माणसाच्या हातात नसतं. प्रत्येक धर्म हा चांगल्याच गोष्टी सांगतो. प्रत्येक धर्माचे मार्ग भिन्न भिन्न असतील, पण अंतिम उद्दिष्ट एकच असते. हिंदू काय किंवा मुस्लीम काय, शेवटी सर्व सारखेच. जाती धर्मापेक्षा माणूस महत्वाचा आहे (शकील शेख : २०१४ : १२). गुरुलिंगप्पा गुरुजी यांच्या या संभाषणातून आपल्याला हे दिसून येते की, त्यांना कोणताही धार्मिक दंगा नको आहे. त्यांना सुख आणि शांती गावात नांदणे गरजेचे वाटते. यासाठी ते यांच्यात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. पण सिद्धाराम ऐकण्याच्या मनस्थितीत नसतो. त्याच्या मनातील मुस्लिमांच्याविषयीचा राग वाढत जातो आणि याची परिणीती रमजानच्या नाहक बळी जाण्याने होते. हिंदू मुस्लीम दंगा होतो. सिद्धारामच्या चुलत्याला गुलबर्ग्याला मुस्लिमांकडून मारले जाते. याचा परिणाम कुलाली गावात होतो. पण तत्पूर्वी गुरुलिंगप्पा गुरुजी सर्व मुस्लीम बांधवाना गावाच्या बाहेर जायला सांगतात. आणि मोठा अनर्थ टळतो. सिद्धाराम गावात येताच सरळ मुस्लीम वस्तीत जातो आणि सारी वस्ती पेटवून देतो. गावातून बाहेर पडलेल्या काही मुस्लिमांना गावाबाहेर मुस्लीम म्हणून संघर्षाला तोंड ध्यावे लागते. कारण हा संघर्ष सगळीकडे पेटलेला असतो. मुस्लिमांना हिंदू आणि हिंदुना मुस्लीम मारत होते. या सगळ्याचा परिणाम कुलाली गावतील पिरसाबच्या कुटुंबाच्या निर्घुण हत्येने होतो.

अखेरीस हैद्राबाद संस्थान भारतामध्ये सामील केले जाते. सर्व लोक पुन्हा आपल्या आपल्या गावी येऊ लागतात. दरम्यान दुष्काळ पडतो. सर्वत्र कामासाठी लोकांना फिरावे लागते. खुतबुच्या गरीब कुटुंबाला कामाची आवश्यकता असते. तो आपल्या लहान मुलाला मलकप्पा पाटीलकडे कामाला पाठवतो. पण त्याच्याही ते जीवावर बेतते. सिद्धारामच्या तिरसट स्वभावाचा बळी खुतबू, सायरा, सलीम आणि खुतबूची पत्नी या सर्वांच्या जाण्याने होतो. म्हणजे कशाचाही संबंध नसताना या मुस्लीम कुटुंबाना भोगाव्या लागलेल्या यातना ही हैद्राबाद मुक्ती संग्रामाची दुसरी बाजू म्हणूनच आपल्याला पाहावी लागेल. सलीम अखेरच्या टप्प्यात सिद्धारामचा पाय तोडतो. ज्या घटनेमुळे भविष्यात सिद्धारामला त्याचा सतत पश्चाताप होत राहतो. तेव्हा तो बोलून जातो की, 'सलीम तू माझा पाय काढला...अन् ह्या गेलेल्या पायानंच मला माणूस म्हणून कसं जगायचं ते शिकवलं!' (शकील शेख : २०१४ : ९५) हाच तर सिद्धारामच्या जगण्याचा शेवट होय.

सिद्धारामने त्याच्या एकूण आयुष्यात अनेक वाईट कृत्ये केली. महिलांवर अत्याचार केले, जातीय, धार्मिक संघर्ष उभा केला. पारूवर अत्याचार केला, सायरावर अत्याचार करून तिला मारून टाकले. तसेच खुतबुच्या कुटुंबाला संपवून

टाकले. असा हा विकृत, क्रूर सिद्धाराम एका बाजूला शकील शेख कादंबरीत चित्रित करतात तर दुसऱ्या बाजूला गुरुलिंगप्पा गुरुजींच्या रूपाने मानवतावादाची पेरणी करतात. ज्या गुरुजींच्या एकूणच वर्तनात आधुनिक मानवतावादी मूल्ये भरलेली आहेत. त्यांचे वर्तन हे माणसाच्या माणूसपणाला श्रेष्ठ ठरवत आहे. अशा पात्रांच्या रूपाने एक अनोखा आणि विचार करायला प्रवृत्त करणारा विषय जुबा या कादंबरीत शकील शेख यांनी चित्रित केला आहे.

३

जुबा या कादंबरीला हैद्राबाद मुक्ती संग्रामाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. कारण एका बाजूला रझाकार सेनेचा हाहाकार तर दुसऱ्या बाजूला या सर्वांशी काडीचा संबंध नसणाऱ्या मुस्लिमांना सोसाव्या लागलेल्या भयाण यातना याचेच चित्र म्हणजे ही कादंबरी होय. यासंदर्भात निष्कर्षात्मक बोलताना प्रस्तावनेत कृष्णा किरवले म्हणतात की, भारतीय परंपरेत आर्यवंशीय व्यवस्थेने स्वसत्तेसाठी हाती घेतलेले संहारक शस्त्र आजतागायत कार्यरत आहे. या संहार शस्त्राचा वापर काही वेळा मुस्लिमांवर, काही वेळा दलितांवर तर काही वेळा ख्रिस्ती लोकांवर केला जातो. हे गेल्या दशकातील घटनाक्रमावरून दिसून येते. शकील शेख यांची कादंबरी जरी हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या पार्श्वभूमीवर आधारित असली तरी समकालीन वास्तवाच्या संदर्भात ती अर्थपूर्ण असून अंतर्मुख करावयास लावणारी आहे (शकील शेख : २०१४ : बारा). मुळात ग्रामीण परिप्रेक्ष्यावर आकाराला येणारी ही कादंबरी मुस्लीम भाषेचा, ग्रामीण संस्कृतीचा एका वेगळ्या भूमिकेतून विचार मांडत असतानाच आपले वेगळेपण सिद्ध करते.

अल्पसंख्याक म्हणून इथल्या मुस्लिमांकडे जे संकुचित आणि संशयाच्या नजरेतून नेहमी पहिले जाते त्याचेच द्योतक ही कादंबरी ठरते. भारतातल्या अशा अनेक घटनांचा उल्लेख करता येईल की, ज्यातून अल्पसंख्य समुदायांना यातना सहन कराव्या लागल्या आहेत. मग तो जातीय अल्पसंख्य असेल किंवा धार्मिक अल्पसंख्य असेल त्याला बहुसंख्य लोकांकडून अतोनात त्रास सहन करावा लागलाच आहे. त्यामुळे हा समुदाय आपल्या सुरक्षेसाठी आपल्या लोकांत जाऊ बघतो आहे. नव्वदनंतरच्या मराठी साहित्यात आकाराला आलेल्या मुस्लीम साहित्याच्या संदर्भातही हाच विचार मांडता येईल ज्यातून तो समकाळातल्या जाणिवा घेऊन मांडणी करतो आहे. याचेच प्रतिनिधित्व जुबा ही कादंबरी करते असे आपल्याला म्हणावे लागते.

जुबा (द्वि. आ.), शकील शेख, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर २०१४

लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मराठी विभागात संशोधक विद्यार्थी आहेत.

www.pvatsaru.com